७

# प्रतापी ' प्रतापसिंह '

## पोंवाडा.

[ चाल---ज्याचि त्रिलोकी कीर्ति व इतर मिश्र ]

( शाहीर— " सोपानदेव " )

चौक १ ला.

ॐ नमो शंभो शिवहर राणाजि रणविर जगीं महशूर
प्रतापी " प्रतापसिंह अभिधान "। मानि रजपूत राणा यशवान
कुळाचा ठेवला खरा अभिमान ॥ जी जी जी जी
स्मरुनिया खऱ्या ब्रीदास। नीतिधर्मास। रक्षुनी खास।
" म्लेच्छांचा उतरविला नकशा "। शेळ्यांपारि उडवुनिया फडशा।
धन्य केले सिसोदिया वंशास ॥ जी जी
मोंगलांचा सर्व अधिकार। हिंदुस्तानभर। शहा अकबर।
" राज्य कारि दिल्लीच्या तख्ताला "। शूर मुत्सद्दी सहाय्याला।
राज्य धुरंधर ह्मणति त्याला ॥ जी जी
विषयांत स्वार्थामधि धुंद। कराया शरमिंद। शरिर संबंध।
" जोडिले देउनिया अधिकार " बनविले रजपुतासि सरदार।
ह्मणति अकबर मोठा दिलदार ॥ जी जी

२९



धूर्तता आणि मनोबल । मायावी जाल । पोटीं हलाहल ।
'मधाची गोडिच तोंडाला' । बाटविल रजपुत वंशाला ।
राजनीतीचा कळस झाला ।। जी जी
रजपूत राजरक्ताचि । आर्य धर्माची । आयाबहिणींची ।
"धरारे धरा कांहींतरी लाज" । स्वस्थकां षंढापरि नाराज ।
गाजवा डंका शौर्याचा आज ।। जी जी
स्वतंत्र्य मंत्र फुंकेला । हक्क दाखविला । सिंह जागा केला
"ऐकव पुढें देऊनी कान" । मानी रजपूत राणा यशवान ।
कुलचा ठेवा खरा अभिमान ।। जी जी

**चौक २ रा.**

धरी राणा ध्यास रात दिन । करी चिंतन । नको सिंहासन ।
"सिंह जणुं सांपडला पिंजऱ्यांत" । नाहीं स्वातंत्र्य त्याचे
कर्मांत । घालव्या घिरट्या आंतल्या आंत ।। जी
कोणाच राज्य वैभव । कशाशी काय । नाहीं कांहिं ठाव ।
"त्याहुनी बरा वाटे वनवास" । मनीं एक स्वतंत्रेची आस ।
हीच तळमळ लागे जीवास । जी जी
(चाल) नको राज्य पदाची आस । हा मूर्तिमंत गळफांस ।।
जी जी जी जी

३०



कसा होऊं म्लेंच्छाचा दास । त्याहून बरा वनवास ।। जी जी ।
धरूं माया भूमिची कांस । कां शरण जाऊं यवनास ।। जी ।
(चाल २) प्रताप सिंह बोलला ।
पाहीजे याच घडिला ।
स्वातंत्र्य माय भूमिला ।
मनिं एक मंत्र चालला ।
हरहर महादेव बोलिन याच बोलाला ।
जन्मुनी मोठ्याच्या कुला ।
कीर्तीचा दीप लाविला ।
ना तरी व्यर्थ जन्मला ।
लागेल डाग वंशाला ।
स्मरुनिया आई भवानीला ।
उत्साह बोलुं लागला ।
चैतन्य खेळुं लागला ह्याच समयाला ।
करुनिया जिवाचा झेला ।
फुलवरा हाच वाहिला ।
जय उदे उदे अंबिके तुझ्या चरणाला ।।

39



[ मिळवणी ]

करावया शत्रुसंहार । आणि कुलोद्धार । प्रताप नरवीर ।
" निघाले वनीं जसें रघुनाथ " रघुपती एक राजपूतांत ।
निवटला सिसोदिया वंशांत ।। जी जी ।।

## चौक ३ रा

( मिळवणी )

पुण्य श्लोक राजराजेश्वर । सोडुनि दरबार । राज मंदीर ।
हिंदु लागले आज रानोमाळ । दीनवाणे झाले बघा
लोकपाळ । कशी विपरीत गती करी काळ ।। जी जी ।।
स्मरुनिया मेवाड ! मेवाड । चितोड ! चितोड लागले वेड ।
" वेड नव्हे स्वतंत्रतेची प्यास " । जीव वाहिला सांगा
कवणास । मातृभूमीच्या नित्य चरणास ।। जी जी ।।
जीव आत्मा एक करून । होति प्रसन्न । महंत योगीजन ।
" योग्याचाहि योग प्रतापराणा " । सर्व परिवार घेउनि
याना । शिकविली योगी वीर बाणा ।। जी जी
( चाल नं. १ ) जमवुनी क्षत्रिय वीर । सर्वास केल
जाहीर । जी जी
व्हा सहाय मजबरोबर । सोडुनि सर्व घरदार ।। जी जी

32



( चाल २ ) करा धन्य धन्य मेवाडाला ।
तुम्हांवाचुन कोण साहायाला ।
या अशा घोर समयाला ।
आलि निशा दुष्ट मोंगलाला ।
जाचिती पहा हिंदुला ।
राज्य-अधीकाराच्या बला ।
आला ताठा त्यांचे आंगाला ।
चित करा त्यांचे गर्वाला ।
बघा जरा माता भगिनीला ।
अनुसरा धर्मशास्त्राला ।
चला त्या हळदि घाटाला ।
हैदोस कसा घालावा । शिकवुं या आतां मोंगलाल ।।
( चाल नं. १ ) जाहली प्रतिज्ञा घोर । आठवोनी शंभो
शिवहर । जी जी
त्या हळदि घाटिचा वीर । गाजवीं रणीं कल्लोळ । जी जी

## चौक ४ था

चाल– हळदी घाट [ **हळदी घाटाचें युद्ध** ]

त्या हळदि घाटाचें युध्द । कुणाला नाहीं कुणाची शुध्द ।

कुरुक्षेत्राच भारतीयुध्द । आठवण ध्यानीं, हा जी जी ॥
चहुंकडे सेना आटोकाट । शिराया नाहीं जराशी वाट ।
फौजेचा अशापरी हा थाट । दोन पक्षाला । जी जी ॥
रजपूत धन्य लढणार । पाठिवर ढाल कटीं तल्वार ।
होउनी घोड्यावरती स्वार । झुंजती भारी ॥ हा जी जी॥
सरदार शौर्यानें धुंद । आंगि चिलखत पगडि शिरबंद ।
छातिचे तुटति तटातट बंद । त्वेश संचरला । हा जी जी ॥
चालती हळदि घाटांत । ढाल तल्वार बरचीचे हात ।
मरा वा मारा शत्रु एकजात । हीच ललकारी । हा जी जीं ॥
उडवितों शिरें गगनांत । छाटले पाय कुणाचे हात ।
मुखांतुनि चाले रक्ताचा पाट । येत अंधेरी । हा जी जी ॥
हर हर ! महादेव घोष । चालला दीन दीन ! बेहोष ।
गर्जना देति अती आवेश । एकमेकांना । हा जी जी ॥
सैन्यांत विजय आनंद । करी तांडव चाले रणरंग ।
जाहला रिपु पक्षाचा भंग । घेत माघारी । हा जी जी ॥
सणसणाट सूं वाणांचा । चाले खणखणाट इतर शस्त्रांचा ।
ध्वनि प्रचंड अग्नि अस्त्रांचा । जाई गगनाला । हा जी जी ॥
वाजती भेरी रण शिंग । झडति दुंदुभी वाद्य रणरंग ।



जाहले ह्यातच सारे दंग । रंग युद्धाचा । हा जी जी ॥
हें असे दृश्य पाहुन । वन्यपशु पक्षीं जाति पळून ।
बिळामधीं साप गेले दडून । कोण ही भीती । हा जी जी ॥
कार्य वर्णुं युद्धप्रसंग । कल्पना शाहिराची झाली दंग ।
डफ तुणतुण पावलं भंग । कुंटली वाणी । हा जी जी ॥

( मिळवणी )

केली किती युध्दें घनघोर । स्वातंत्र्यरणवीर ।
भरतभूमिवर । " करुनिया स्वतंत्र मेवाडास " ।
प्रतापी प्रतापसिंह, शाबास ! जाहला वंद्य सर्व—
जगतास ॥ जी जी जी जी

( " प्रतापी प्रतापसिंह पोवाडा—
निवडक भाग )

समाप्त